# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.02.2025** **वार- सोमवार**

---

**बारावी परीक्षा**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला उद्यापासून राज्यभरात सुरुवात होत आहे. या परीक्षेसाठी 15 लाख 5 हजार 37 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती मंडळानं दिली आहे. राज्यभरातील 3 हजार 373 मुख्य केंद्रावर परीक्षा होणार आहे. परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळानं 271 भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.

**राममोहन नायडू**

संविधानानं सर्वांना समान हक्क आणि मूलभूत अधिकार दिले आहेत. त्यामुळे विकसित भारताच्या निर्मितीसाठी जबाबदारी घ्या आणि लोकसेवा करण्यासाठी राजकारणात या, असं आवाहन केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजरापू यांनी भारतीय छात्र संसदेतील देशभरातील युवा प्रतिनिधींना केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठ पुणे आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्मेंट, पुणे यांच्या वतीनं आयोजित 14 व्या भारतीय छात्र संसदेत भारतीय संस्कृती की पाश्चात्य ग्लॅमर : भारतीय युवकांची कोंडी या विषयावर नायडू बोलत होते.

**राष्ट्रपित्याचे पुण्यस्मरण**

महात्मा गांधी रक्षा विसर्जन स्मृती दिनानिमित राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि आळंदी नगर परिषदेनं 'राष्ट्रपित्याचे पुण्यस्मरण' हा कार्यक्रम आयोजित केला आहे. आळंदी घाटावरील रक्षा विसर्जन स्तंभ इथं येत्या 12 तारखेला सकाळी साडेआठ वाजता हा कार्यक्रम होईल. 12 फेब्रुवारी 1948 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या अस्थी रक्षेचं विसर्जन इंद्रायणीमध्ये करण्यात आलं होतं. त्यांची स्मृती म्हणून याठिकाणी रक्षा विसर्जन स्तंभ उभारण्यात आला आहे.

**जीबीएस आजार**

पुणे महापालिका हद्दीत वास्तव्य असणाऱ्या आणि शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचे सभासद असलेल्या रुग्णांना 1 लाख रुपयांपर्यंत, अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटरवर उपचार घेणाऱ्यांना दोन लाखांपर्यंत, तर शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचे सभासद नसलेल्या, मात्र महापालिका भागात वास्तव्यास असलेल्या आणि जीबीएस आजारासाठी अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटरवर उपचार घेणाऱ्या रुग्णांना 1 लाखाची मदत केली जाणार आहे. सध्या महापालिका हद्दीतील रहिवासी असणाऱ्या नागरिकांना महापालिकेकडून मदत केली जात आहे. आरोग्य विभागाला संबंधित रुग्णालयाने त्वरित रुग्णाची माहिती कळविणे बंधनकारक राहील असं पुणे महापालिका आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी सांगितले.

**झाडणकाम**

पुणे शहरातील प्रमुख रस्त्यांचं झाडकाम यांत्रिकीकरणाद्वारे करण्यासाठी तीन परिमंडळाच्या 129 कोटी 62 लाख निधीच्या निविदाना पुणे महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. झाडणकाम करण्यासाठी प्रत्येक रस्त्याला 7 कर्मचारी आणि तीन वाहन ठेवण्याच्या अटी टाकण्यात आल्या आहेत.

**E Prison**

राज्यातील कारागृहातील परदेशी आणि स्थानिक कैद्यांसाठी E Prison प्रणाली अंतर्गत E मुलाखत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गेल्या वर्षभरात या सुविधेच्या माध्यमातून 3 लाख 16 हजार मुलाखती झाल्या आहेत. पुण्यातील येरवडा कारागृहात यापैकी 45 हजार मुलाखती पार पडल्या. कारागृहातील बंदी E मुलाखत सुविधेद्वारे नातेवाईक आणि वकिलांशी संवाद साधू शकतात.

**मानव्य स्मृतिदिन**

एचआयव्ही संसर्गित मुलांची संपूर्ण जबाबदारी घेतलेल्या मानव्य संस्थेच्या संस्थापिका कर्मयोगिनी विजयाताई लवाटे यांच्या 20 व्या स्मृतिदिनानिमित्त उद्या 11 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 5 वाजता भांडारकर संस्थेत पुरस्कार वितरण सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. पुरस्काराचं हे पहिलं वर्ष असून, डॉक्टर इरा शहा आणि संतोष पवार यांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**अर्थसंकल्प**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सच्यावतीनं अर्थसंकल्पावरील तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे प्रत्यक्ष सादरीकरण यावेळी. विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. प्रा. महेश महांकाळ, ॲड. सुकृत देव यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

**हिंदू गर्जना चषक**

पुण्यात पार पडलेल्या, 'हिंदू गर्जना चषक' महिला आणि पुरूष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत आज खुल्या गटामध्ये कोल्हापुरच्या शुभम शिदनाळे नं तर, कुमार गटात हवेली सुरज चोरघे तसेच महिला गटामध्ये कोल्हापुरच्या अपेक्षा पाटील यांनी विजेतेपद संपादन करून मानाची चांदीची गदा पटकावली.स्पर्धेचे पारितोषिक वितरण महाराष्ट्र राज्य नगरविकास, परिवहन, राज्यमंत्री माधुरी सतीश मिसाळ यांच्या हस्ते झालं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं असून कमाल 34 तर किमान 17 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही  हवामानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांत मध्ये विविध भारतीच्या पुणे केंद्रांवर.**